RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ३३(३)] गुरुवार, जून २९, २०१७/आषाढ ८, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे कार्यालय**

राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५, दिनांक १३ एप्रिल २०१६

**आदेश**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१२(१)(२०१५)/अधिसूचना/५०६/२०१६.—महाराष्ट्राच्या राज्यपालांनी काढलेली पुढील अधिसूचना सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**ज्याअर्थी,** संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) अन्वये राज्यपालांना जाहीर अधिसूचनेद्वारे, असे निदेश देता येतील की, संसदेचा किंवा राज्याच्या विधानमंडळाचा एखादा विशिष्ट अधिनियम भारतीय संविधानाच्या कलम २४४ मधील खंड (१) मध्ये समाविष्ट राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला, किंवा त्यांच्या एखाद्या भागाला लागू असणार नाही, अथवा त्या अधिसूचनेतील विशिष्ट अपवादांच्या व फेरबदलांच्या अधीन राहून राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असेल ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी काढलेल्या क्रमांक आरबी/टीसी/ई-११०१९(८९)(२०१३)/अधिसूचना-४/११२०/२०१४- दिनांक ३० ऑक्टोबर २०१४ च्या अधिसूचनेनुसार (यापुढे जिचा उल्लेख " सदर अधिसूचना " असा करण्यात आला आहे), भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) (यापुढे ज्याचा उल्लेख " ग्रामपंचायत अधिनियम " असा करण्यात आला आहे) मध्ये फेरबदल केले आहेत;

**आणि ज्याअर्थी,** सदर अधिसूचनेद्वारे, ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ५४ ख मध्ये खंड (ढ) नंतर एक नवीन खंड (ण) समाविष्ट करण्यात आला आहे, ज्यानुसार त्या त्या वार्षिक योजनेच्या एकूण जनजाति उप-योजना निधीच्या ५ टक्क्यापेक्षा कमी नसेल इतका निधी, अनुसूचित क्षेत्रातील ग्राम पंचायतींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात येईल ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २२ मार्च २०१६ च्या पत्राद्वारे, आदिवासी विकास विभागाने, हस्तांतरणाचे सूत्र हे ग्रामपंचायतीतील अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असावे हे सुनिश्चित करण्यासाठी, उक्त अधिसूचनेत सुधारणा करण्याची विनंती केली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त प्रयोजनासाठी ग्रामपंचायत अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप-परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, ग्रामपंचायत अधिनियमात पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :—

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) मध्ये, कलम ५४ ख मधील खंड (ण) मध्ये, उक्त अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आलेल्या पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, त्या त्या वार्षिक योजनेच्या एकूण जनजाती उप-योजना निधीच्या ५ टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतका निधी, महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना प्रत्येक ग्रामपंचायतीला अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येशी एकूण ग्रामपंचायतींच्या अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात येईल ;"

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
राज्यपाल यांचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.